| | |
|---|---|
| MHDH070028902022 | <u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ६५७/२०२२ मधील</u><br><u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>.<br>**(**बारकू वि**.** तहसिलदार**,** शिरपूर**)** |

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार नामे बारकू मुकूंदा विसपूते यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) प्रमाणे त्यांच्या वडीलांची जन्मनोंद ग्रामपंचायत, थाळनेर, ता. शिरपूर, जि. धुळे यांच्या अभिलेखामध्ये करण्यात यावी यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदाराचे वडील नामे मुकूंदा नागो विसपूते(सोनार) यांचा जन्म दिनांक ०४.०१.१९३६ रोजी मौजे थाळनेर, ता. शिरपूर, जि. धुळे येथे झाला आहे. अर्जदाराचे नातेवाईकांना पुरेसे ज्ञान नसल्याने सदर नोंद करावयाचे राहून गेले आहे. अर्जदारास त्याचे मुलांचे शैक्षणिक कामाकरिता सदर जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तहसिलदार, शिरपूर यांनी सदर जन्माची नोंद नसल्याच्या आशयाचे प्रमाणपत्र अर्जदारास दिले.

३. अर्जदाराने स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ७ वर दाखल केलेले असून अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे फेरकथन केले आहे. अर्जदाराने थाळनेर, येथील ग्रामपंचायत मध्ये सदर जन्माची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र तहसिलदार यांनी दिलेले निशाणी क्र. ३ वरील यादीसोबत, अर्जदाराच्या वडीलांच्या आधार कार्डाची प्रत निशाणी क्र. ६ वरील यादी सोबत, वृत्तपत्र दैनिक वार्ता मधील जाहीर प्रगटन निशाणी क्र. ६ वरील यादीसोबत दाखल केले आहेत. तसेच साक्षीदार म्हणून हिलाल देवचंद रायसिंग यांचे शपथपत्र निशाणी क्र. १० वर दाखल केले आहे. सदर साक्षीदाराने अर्जदाराच्या कथनास दुजोरा दिलेला आहे.

४. वरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराच्या वडीलांची जन्माची नोंद संबंधित कार्यालयाच्या अभिलेखात घेण्यात आलेली नाही. जाहीर प्रगटन प्रसिध्द होवून देखील प्रस्तुत अर्जास कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदाराचे वडील यांच्या आधार ओळखपत्रावर देखील त्यांचा जन्म दिनांक ०४.०१.१९३६ नमूद

आहे. न्यायालयासमोर आलेल्या अर्जदाराच्या तोंडी व लेखी पुराव्यावरुन असे दिसते की, अर्जदाराच्या वडीलांचा जन्म दिनांक ०४.०१.१९३६ रोजी झाला असून अर्जदारास जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदाराचा अर्ज मंजुर करणे योग्य होईल. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येवून तहसिलदार, शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे यांना असे आदेशीत करण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे मुकूंदा नागो विसपूते (सोनार) यांचा जन्म दिनांक ०४.०१.१९३६ रोजी थाळनेर, ता. शिरपूर, जि. धुळे येथे झाल्याबाबत नोंद अभिलेखात नियमाप्रमाणे विलंब शुल्क आकारुन घेण्यात यावी.

२. अर्जाच्या खर्चाबद्दल आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BHADRE RAMESH RAOAJI
Date: 2023.02.04 17:17:11 +0530

शिरपूर.
दिनांक ०४.०२.२०२३.

(आर. आर. भद्रे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र. १)
शिरपूर, जि. धुळे.

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव :- गोपाल अंकुश पाटील.

कार्यालयाचे नाव :- न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र. १)
शिरपूर, जि. धुळे.

पी.डी.एफ. फाईल
अपलोड केल्याचा दि. :- ०४.०२.२०२३.